शासन–विरुध्द–पिंकू

निशाणी क्र. ७

**फौ.प्र.सं.२९९ प्रमाणे**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी –**

**मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव –निलेश हरीदास लांबट

वय –४१ वर्षे, कामधंदा –शेती,

राहणार–मांगली, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे स.शा.अ. श्री. एस.आर.ठावरी यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

०१. दि.१८/१०/२००६ रोजी पोलीसांनी मला अनिलच्या पानठेल्याजवळ पंच म्हणून बोलविले होते काय, हे मला आठवत नाही. माझे समक्ष पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला होता काय, हे मला माहित नाही. मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर मला माहित नाही.

**साक्षीदार त्याचे पूर्वीचे बयाणापासून परावृत्त झाल्यामुळे साक्षीदारास सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी विशेष सरकारी वकील यांनी मागितली, परवानगी देण्यांत आली...**

हे खरे नाही की, दि.१८/१०/२००६ रोजी पोलीसांनी मला चंद्रपूर वरोरा हायवेवर अनिलच्या पानठेल्याजवळ पंच म्हणून बोलविले होते व माझे समक्ष घटनास्थळाची पाहणी करुन घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. हे खरे नाही की, पानठेल्याला असलेले दोन कुलुप तुटले होते आणि दार खुले होते व पानठेल्यातील सामान अस्ताव्यस्त पडले होते. हे खरे नाही की, पंचनाम्यातील मजकुरावर मी वाचुन समजुन सही केली होती.

**सरतपास पूर्ण.**

**उलट तपास–काही नाही. फौ.प्र.सं.२९९ प्रमाणे असल्यामुळे**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

समक्ष,

Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.05.07 16:43:47 +0530

दिनांकः– ०७/०५/२०२६

**(ए.एस. जरुदे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भद्रावती